## यशोगाथा

# यज्ञेश सावे यांची करार शेतीतून भाजीपाला व मत्स्यशेती


**उत्तम सहाणे**
पीक संरक्षण विषयतज्ज्ञ
कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल
ता. डहाणू, जि. ठाणे ४०१७०३
मो. ८०८७९८५८९०


तलासरी तालुका (जि. ठाणे) आणि गुजरातच्या सीमेवर झाई बोरीजाव नावाचे एक गाव. तेथील एक प्रगतीशील शेतकरी म्हणजे श्री. यज्ञेश सावेले. यज्ञेश सावे नुसते प्रगतीशील शेतकरीच नाही तर शेतीसोबत शेतीमधील वेगवेगळ जोडधंदे आणि कोणत्या वेळी कोणती पिके कशी घ्यावी याचं सखोल ज्ञान असणारे जाणते शेतकरी यज्ञेश सावे यांचे वय ४९ वर्ष. पूर्वी घरची परिस्थिती गरिबीची असल्यानं फक्त दहावीपर्यंतच शिक्षण घेता आलं. परंतु त्यांची शेती आणि त्यामधील आधुनिक तंत्रज्ञान बघितल्यानंतर कोणालाही त्यांच्या शिक्षणाबद्दल शंका येणार नाही. कोणी अडलेला शेतकरी मार्गदर्शन घ्यायला त्याच्याकडे जाओ किंवा कोणी अधिकारी भेट द्यायला जाओ, अशा वेळी काहीही संकोच न बाळगता मनमोकळेपणाने संवाद साधण्याचा आणि आपल्याकडे जे काही ज्ञान उपलब्ध आहे ते देण्याचा त्यांचा आग्रह असतो.


यज्ञेश सावे यांच्याकडे सुरुवातीची वडीलोपार्जित फक्त ३ एकर जमीन होती. तेवढ्या जमिनीवरच न राहता चौकस बुद्धीच्या श्री. सावे यांनी गावाच्या आजूबाजूला ज्या काही पडीक जमिनी होत्या आणि त्यांचे मालक मुंबई, ठाणे शहरात वास्तव्यास गेलेले होते, त्यांना जमिनी करणे शक्य नव्हते. अशा लोकांच्या भेटी घेतल्या. त्यांची शेती श्री. सावे यांनी करायला घेतली. जमिन मालकाच्या इच्छेनुसार आंबा, चिकू, नारळ, लिची अशा फळबागांची लागवड त्यात सुरू केली. चार ते पाच वर्षात उत्पादनाला सुरुवात होताच विकसित केलेली जमीन संबंधित जमीनदाराच्या ताब्यात दिली जाते. तोपर्यंत त्या जमिनीत आंतरपीक म्हणून हवा तो भाजीपाला लावून त्याचे उत्पन्न श्री. सावे घेतात. हे भाजीपाला उत्पन्न म्हणजेच या शेती कराराचा मोबदला श्री. सावे यांना मिळतो.

या करार शेतीमध्ये हंगामानुसार टोमॅटो, वांगी, दुधी, हिरवी मिरची, कोबी, फ्लॉवर, पडवळ, चवळी, कारले, तोंडली, गवार यासारख्या भाज्या. तसेच झेंडूची फुलशेती केली जाते. या करार पद्धतीने शेती करण्यासाठी थोडी-थोडी शेती वाढवत सध्या ते दीडशे एकरपर्यंत करार शेती करतात. यातील उत्पन्नातून त्यांनी स्वत:साठीही काही शेती खरेदी केली आहे. सध्या त्यांच्याकडे स्वत:ची २० एकर शेती आहे. या शेतीमध्ये आंबा दोन एकर, चिकू पंधरा एकर, नारळ १५० झाडे आणि फळपिके, पेरू, ॲवाकॅडो. पिकाची लागवड केलेली आहे. ह्या सर्व पिकांचे योग्य पद्धतीने नियोजन सावेजी करत असतात. बहुतेक कामे ही मजुरांकडून कंत्राटी पद्धतीने केली जातात. उदा. शेताची बांधणी, लागवड, आंतरमशागत इत्यादी. या कामासाठी त्यांच्याकडे दररोज १५० ते २०० मजूर काम करतात.


श्री. यज्ञेश सावे यांचे स्वत: शेतीमध्ये काटेकोर पद्धतीने नियोजन असते. या नियोजनात आणि कामात त्यांच्या पत्नी सौ शीतल यांचीही मोलाची मदत होते. त्यांची दो मुले यशित अकरावीत आणि युगां सहावीच्या वर्गात शिकत आहेत. आपल्याल गरीब परिस्थितीमुळे दहावीच्या पुढचे शिक्षण घेता आले नाही, याची खंत श्री. यज्ञेशजींन आहेत. परंतु आपल्या मुलांना चांगले शिक्षण घेता येऊन त्यांचे भविष्य उज्वल व्हावे यासाठी ते सर्वपरीने प्रयत्नशील आहेत.

शेतीमधील योग्य नियोजन आणि आजूबाजूच्या इतर शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन केल्याबद्दल श्री. यज्ञेश सावे यांची राज्य सरकारने तसेच अनेक स्वयंसेवी संस्थांनीही दखल घेऊन गौरव केला आहे. त्यातील काही निवडक पुरस्कार असे :

१) वसंतराव नाईक कृषिभूषण राज्य पुरस्कार
२) वसंतराव नाईक शेती निष्ठ राज्य पुरस्कार
३) राष्ट्रस्तरीय कृषिभूषण पुरस्कार
४) महात्मा ज्योतिबा फुले कृषिभूषण पुरस्कार



५) रत्नगौरव पुरस्कार
६) प्रतिभारत पुरस्कार
७) महाराष्ट्र एकात्मता फेलोशिप
८) भारतीय विकास प्रतिष्ठान पुरस्कार
९) आर. सी. एफ. चे दोन पुरस्कार
१०) ठाणे जिल्हा प्रगतीशील शेतकरीचे ५ वेळा पुरस्कार



**पिकांचे योग्य नियोजन**

कोणताही भाजीपाला पीक लावायचं म्हणजे नियोजन महत्त्वाचं. त्यातल्या त्यात मार्केटिंग किंवा बाजारभाव यांचा खास अभ्यास श्री. यज्ञेशजींकडे आपल्याला बघायला मिळेल. जसं मागील वर्षातला टोमॅटोच्या दरातील चढउतार, पावसाची स्थिती मजुरांची उपलब्धता इत्यादी बाबींनुसार लागवडीचे नियोजन केले जाते. श्री. यज्ञेशजींचे झेंडू पीक लावतानाचे नियोजन समजून घेण्याजोगे आहे. नवरात्र, दसरा आणि दिवाळी ह्या सणांच्या वेळी झेंडू फुलाला बाजारात चांगली मागणी असते आणि हमखास चांगला भाव मिळतो. ही संधी साधण्यासाठी दसऱ्याच्या ७० दिवस आधी झेंडूची लागवड केली तर झेंडूला भाव मिळून पैसेही चांगले येतात, हा त्यांचा अनुभव आहे. झेंडू पिकाला पाणी पूर्णपणे ठिबकने दिले जाते. एक एकरात सावे आठ ते दहा टन उत्पादन घेतात. मागील वर्षी झेंडूला सरासरी २५ रुपये प्रति किलो भाव मिळाला. एक एकरात बियाणे, खते आणि मजुरीवर साधारणपणे ५० ते ६० हजार रुपये खर्च होतो. हा खर्च वजा जाता एकरी दीड लाखांचे उत्पन्न शिल्लक राहते.

**टोमॅटोचे रोपवाटिकेपासूनच नियोजन -**

यज्ञेश सावे यांचे या वर्षी २० एकर टोमॅटो लागवडीचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी १० गुंठ्यांमध्ये आधुनिक पद्धतीने रोपवाटिका तयार केली आहे. त्यासाठीचे मार्गदर्शन जवळच असलेल्या कृषि विज्ञान केंद्र कोसबाड येथील तज्ज्ञांकडून मिळत असते. रोपवाटिकेसाठी जानेवारी महिन्यात गादीवाफे तयार केले. त्यात कुजलेले शेणखत टाकले. त्यासोबत ट्रायकोडर्मा हे जैविक बुरशीनाशक वापरले. संकरित वाणाची निवड करून ७५० ग्रॅम एवढे बियाणे पेरले. रोग आणि किडीच्या बंदोबस्तासाठी किडनाशकांचा शिफारशी प्रमाणे वापर केला जातो. दरवर्षीच्या नियोजनाप्रमाणे सावे टोमॅटो लागवड पूर्णपणे ठिंबक सिंचनवर करतात त्यामुळे आवश्यक तेवढेच पाणी दिले जाते. आणि तणांचा उपद्रव पण कमी होतो. मजुरांची बहुतेक कामे जसे खते देणे, झाडांना दोरी बांधणे वगैरे कंत्राटी पद्धतीनेच करून घेतात.

**भाजीपाल्याची विक्री व्यवस्था**

टोमॅटो, कारली, पडवळ आणि इतर सर्व भाजीपाला व्यापाऱ्यामार्फत जागेवरच विकला जातो. व्यापाऱ्याला एकाच वेळी पाच-सहा प्रकारचा भाजीपाला मिळतो तसेच एकाच जागेवर टेम्पो भरला जात असल्याने मुंबई किंवा वापी (गुजरात) भागातील व्यापारी रोख पैसे देऊन भाजीपाला घेऊन जातात.

**मत्स्यपालनाचा जोडधंदा :**

यज्ञेश सावे नेहमी सांगत असतात, आपल्या भागात जी काही उपलब्ध नैसर्गिक संपत्ती आहे, त्याचा योग्य प्रकारे उपयोग करून घेतला पाहिजे. त्यांच्या गावात काही तलाव आहेत. हे तलाव दरवर्षी मे महिन्यात लिलाव पद्धतीने भाड्याने घेतले जातात. त्यामध्ये मत्स्यबीज सोडले जाते. २५ एकर तलावासाठी ते १५० डबे मत्स्यबीज टाकतात. माशांना खाद्य म्हणून भाताचा कोंडा, शेंगदाण्याची पेंड, शेतातील टाकाऊ धान्य तसेच टाकाऊ भाजीपाला टाकला जातो. कोळंबीसाठी चिकन सेंटरमधील वेस्टेज टाकले जाते. बोटीद्वारे तलाव सतत हलता ठेवला जातो.

साधारण जून महिन्यापासून सात ते आठ महिने मासेमारी केली जाते. हंगामात गरजेप्रमाणे पाच ते सहा मजूर घेतले जातात. या तलावातून रोहू मृग १ ते दीड किलो, ग्रास कटर दीड किलो, ब्रिगेड २ ते ४ किलो, नंदी १ ते दीड किलो तसेच संपूर्ण वाढ झालेला मोठा कटला दीड ते २ किलोपर्यंत वजनाचा तयार होतो. दररोज २०० ते ३०० किलो मासे मिळतात. याची विक्री स्थानिक ग्राहकांद्वारे होते, तसेच गुजरातमधील ग्राहक येऊन घेऊन जातात. माशांच्या जाती आणि वजनानुसार ६० रुपयांपासून १०० रुपयांपर्यंत दर असतो. तलावाचे भाडे दोन लाख रुपये दिले जाते. बियाणे आणि खाद्यासाठी सुमारे तीन लाख रुपये खर्च येतो. साधारणपणे एका तलावातून वर्षभरात ४ ते ५ लाखांचे उत्पन्न मिळते.

**यज्ञेश सावेंचा शेतकऱ्यांना सल्ला -**

शेतकऱ्यांचे आपल्या शेतीमधील नियोजन अतिशय महत्त्वाचे आहे. एखाद्या कंपनीच्या व्यवस्थापकाप्रमाणे आपल्या शेतीचे वर्षभराचे नियोजन करून त्याची काटेकोर अंमलबजावणी करावी. वर्षभरात बाजारामधील भाजीपाल्याचे दर, बाजारातील चढउतार याचा बारकाईने अभ्यास करावा. तसेच शेतीमधील टाळता येण्याजोगा अनावश्यक खर्च टाळावा, म्हणजे शेती नक्कीच फायद्याची होईल.